**नियमित फौजदारी केस नं. ५८/२०२४**
**नि. क्र. १९**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ चा जबाब शपथेवर सुरु.**

**नाव** – प्रशांत सुरेश रसाळ,

**वय**– ४४ वर्षे, **व्यवसाय** – खाजगी मजुरी,

**राहणार** – निवे बुद्रुक, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**अभियोगपक्षातर्फे सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर**

**यांचेकडून–**

**०१**. दिनांक ०८/०८/२०२४ रोजी मी गावी हजर होतो. त्यादिवशी मी ग्रामपंचायत समोर उभा असताना पोलिसांनी मला गावडे यांच्या घरासमोर पंचनामा करण्यासाठी बोलाविले होते. त्यानंतर मी गावडे यांच्या घराच्या पाठीमागच्या बाजूस गेलो. त्यावेळी माझ्यासोबत कृष्णा जोशी व पोलिस हजर होते. सदर घरामध्ये चोरी झाली होती. त्यावेळी तेथे एक हंडा, एक कळशी, एक कढई, लहान–मोठे पाच डबे, एक कुलूप व एक लोखंडी सळई इत्यादी मुद्देमाल मिळून आला. तो पोलिसांनी ताब्यात घेवून एका गोणपाटात बांधले. त्यानंतर माझी सही घेण्यात आली. सदरचा पंचनामा दुपारी २.०० ते २.३० च्या सुमारास करण्यात आला. *(साक्षीदारास घटनास्थळ पंचनामा दाखविला). तो तोच असून त्यावर अनु.क्र.१ चा पंच म्हणून माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. (सदर दस्तास **निशाणी क्र. २०** देण्यात येते. )*

**०२**. त्यावेळी तेथे छायाचित्रे घेण्यात आली होती. *(साक्षीदारास प्रकरणातील छायाचित्रे दाखविण्यात आली.) अनुक्रमांक १ व ३ कडील छायाचित्र हे घराच्या पाठीमागच्या बाजूला असून त्यामध्ये मी, जोशी, गावडे व पोलिस हजर असल्याचे व समोर भांडी पडल्याचे दिसत आहेत. अनुक्रमांक २ व ४ कडील छायाचित्र हे घराच्या आतील भागाचे असून त्यामध्ये मी, जोशी, गावडे व दोन पोलिस हजर आहेत.*

*अनुक्रमांक ५ कडील छायाचित्रात लॉक तोडलेले दिसत असून त्यामध्ये जोशी, गावडे व मुरुडकर पोलिस हजर आहेत. (**<u>सदर छायाचित्रांना ओळखीकरिता एकत्रितपणे वस्तू अ</u>** देण्यात येते.)*

०३. सदरचा मुद्देमाल दाखविल्यास मी ओळखू शकतो. *(साक्षीदारास मुद्देमालाचे गोणपाट दाखविण्यात आले.) ते तेच असून त्यावर असलेल्या लेबलवर माझी सही आहे. (सदर गोणपाटातील मुद्देमाल– एक ॲल्युमिनीअमचे तपेले, लहान–मोठे आकाराचे ॲल्युमिनीअमचे पाच डबे, एक तांब्याची कळशी, एक तांब्याचा हंडा, एक ॲल्युमिनीअमची कढई साक्षीदारास दाखविण्यात आला. तसेच उर्वरित मुद्देमाल एक सळई व एक तोडलेले कुलूप साक्षीदारास दाखविण्यात आला.) तो सर्व तोच असून त्यावर असलेल्या सर्व लेबलवर माझी सही आहे. **<u>(एक ॲल्युमिनीअमचे तपेले यास वस्तू ब, लहान–मोठे आकाराचे ॲल्युमिनीअमचे पाच डबे यांना एकत्रितपणे वस्तू क, एक तांब्याची कळशी यास वस्तू ड, एक तांब्याचा हंडा यास वस्तू इ, एक ॲल्युमिनीअमची कढई यास वस्तू ई, एक सळई यास वस्तू ए व एक तोडलेले कुलूप यास वस्तू ऐ देण्यात येते.)</u>***

*(मुद्देमालातील एक ॲल्युमिनीअमचे तपेले, लहान–मोठे आकाराचे ॲल्युमिनीअमचे पाच डबे, एक तांब्याची कळशी, एक तांब्याचा हंडा, एक ॲल्युमिनीअमची कडई या प्रत्येकावर साक्षीदाराच्या सहीचे लेबल नसल्याची नोंद घेण्यासाठी बचाव पक्षातर्फे विनंती करण्यात आली. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी तो सर्व मुद्देमाल एका गोणपाटात भरलेला असल्याने गोणपाटावर असलेल्या लेबलवर साक्षीदाराची सही असल्याचे कथन सादर केले. त्याप्रमाणे सदरची नोंद घेण्यात येत आहे.)*

०४. सदरचा सर्व मुद्देमाल हा घराच्या पाठीमागील बाजूस जप्त करण्यात

आला.

**सरतपास पुर्ण.**

**मध्यांतराच्या सुट्टीमुळे साक्षीदाराचा उलटतपास मध्यांतराच्या सुट्टीपर्यंत तहकूब.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI Date: 2026.06.05 18:10:42 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

दि. ०५.०६.२०२६ न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,

**स्थळः देवरुख** **जि. रत्नागिरी.**

**मध्यांतरानंतर उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. आर.एस.जोशी यांच्याकडून शपथेवर सुरु–**

**०५**. हे म्हणणे खरे आहे की, मी त्या सदर दिवशी ग्रामपंचायतीसमोर उभा असल्याची बाब पंचनाम्यात नमूद नाही व त्याचे काही कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी अनेक गुन्ह्यांमध्ये पंच म्हणून काम पाहिलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझी ओळख नसताना पोलिसांनी मला थेट पंचनाम्यासाठी बोलावण्याचे काही कारण नाही. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यातील मजकूर खरा आहे की नाही, हे मला आज रोजी सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रत्यक्ष घटनास्थळी गेलेलो नव्हतो. पंचनाम्यामध्ये सळईची लांबी नमूद केली नसल्याचे कारण मला सांगता येणार नाही.

**०६**. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यामध्ये नमूद केलेले अक्षांश–रेखांश व चतुःसिमा मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, घरामधील जुनी भांडी घराच्या पाठीमागील बाजूस ठेवण्याची खेडेगावात पध्दत असते. हे म्हणणे खरे आहे

की, पंचनाम्यामधील मजकूर मला जशाच्या तसा सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, वस्तू अ कडील छायाचित्रांवर माझी स्वाक्षरी नाही. हे म्हणणे खरे आहे की, दुस–या पंचाचे संपूर्ण नाव मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मुद्देमालातील प्रत्येक भांड्यावर माझ्या सहीचे लेबल नाही. हे म्हणणे खरे आहे की, तशी भांडी खेडेगावामध्ये बाजारात सहज उपलब्ध होवू शकतात.

**०७**. हे म्हणणे खरे नाही की, मी महेंद्र गावडे यांस त्याच्या शेतीकामात मदत करतो. हे म्हणणे खरे नाही की, महेंद्र गावडे हा माझा मित्र आहे. हे म्हणणे खरे नाही की, महेंद्र गावडे याला मदत करण्यासाठी आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलिस ठाण्यात बसून को–या कागदावर मी सही केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील सर्व मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.06.05 18:10:50 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

दि. ०५.०६.२०२६ न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,

स्थळः देवरुख जि. रत्नागिरी.

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | K.K.Bhingarde (Jr. clerk) |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Devrukh |
| Date of decision | :- | 05/06/2026 |
| Evidence signed by PO. on | :- | 05/06/2026 |
| Evidence uploaded on | :- | 05/06/2026 |